दिवाई विशेषांक

# अहिराणी कस्तुरी

संपादिका : सौ. विजया एस. मानमोडे

पुणे * वर्ष १ * अंक १ * नोव्हेंबर २०१५ * किंमत रु.५०/- * पृष्ठसंख्या : ६०



## खान्देश अहिराणी कस्तुरी, जतन करस साहित्य संस्कृती

राज्यस्तरीय ग्रामिण अहिराणी साहित्य संमेलन : पिंगळवाडे, ता. अंमळनेर, जि. जळगाव - दि. १९ सप्टेंबर २०१५



# लोकल ते ग्लोबल हा कंपनीचा प्रवास प्रेरणादायी





**ज्यांनी जग घडविले, अशा जागतील महत्त्वपूर्ण कंपन्यांच्या कार्याचा आढावा घेऊन फॉर्च्यूनने जाहीर केलेल्या यशस्वी कंपन्यांच्या मानांकनात भारतातून एकमेव जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.च्या निवडीने शेतकऱ्यांचा गौरव झाला आहे. वोडाफोन, गुगल, टोयाटो, वॉलमार्ट, जीएसके, सिसको, फेसबुक, मास्टर कार्ड, स्टारबक्स, नाईक, फोर्ड मोटर्स अशा मातब्बर कंपन्यांच्या समवेत भारतातील जैन इरिगेशनने आपल्या कार्याचा अपूर्व ठसा उमटवीत या जागतिक यादीत ७ व्या क्रमांकावर स्थान मिळविले आहे. ही घटना जैन इरिगेशनच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली गेली आहे. यानिमित्त समाज जैन इरिगेशनच्या प्रगतीबाबत अतुल जैन यांच्याशी केलेली खास बातचित...**

आपल्या कंपनीच्या व्यावसायिक धोरणाला भक्कम करीत विविध सामाजिक प्रश्नांची उकल करण्यासाठी व्यवसायाचा भाग समजून यावरही कार्य करून महत्त्वपूर्ण पल्ला गाठला, अशा कंपन्यांचे योगदान अधोरेखित करण्याच्या उद्देशाने फॉर्च्यूनने ही मानांकने जाहीर केली. जैन इरिगेशनने भारतातील ५० लाख अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील सुमारे अडीच कोटी लोकांच्या जीवनात बदल घडवून आणला. ठिबक सिंचन व उच्च कृषी तंत्रज्ञानामुळे त्यांच्या आर्थिक प्रगतीचे मार्ग विस्तारित झाल्याचा गौरव फॉर्च्यूनने दिलेल्या सन्मानपत्रात केला आहे. १९८६ मध्ये ठिबक व सूक्ष्मसिंचन तंत्रज्ञान जिथे मोठे धनिक शेतकरी व व्यावसायिक कृषीचेच द्योतक होते तिथे हे तंत्रज्ञान भारतातील अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य जैन इरिगेशनने केले आहे. या तंत्रज्ञानातून मोठ्या प्रमाणात जलबचत साध्य झाली. पाणी थेंबाने... पीक जोमाने (मोअर क्रॉप... पर ड्रॉप) या आपल्या वचनबद्ध घोषवाक्याला जैन इरिगेशनने सार्थ ठरवीत शेतकऱ्याचे कृषी उत्पादन ५० टक्क्यांपासून ३०० टक्क्यांपर्यंत उच्च कृषी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतकऱ्याना वाढवून दिले. त्याचप्रमाणे ५० टक्क्यांहून अधिक पाण्याची बचतही ठिबक सिंचनाने साध्य झाली आहे. यात त्यांचे आर्थिक उत्पन्नही वाढले. उच्च कृषी तंत्रज्ञानासमवेत अतिघनदाट लागवड पद्धत, ऊती संवर्धन तंत्रज्ञान, ग्रामीण भागातील ऊर्जेचा प्रश्न लक्षात घेता त्याला सौरऊर्जेवर चालणाऱ्या पंपाची जोड, नारळ व कॉफीसारख्या पिकांवरही संशोधनात साध्य केलेला टप्पा, भात आणि गहू पिकावरही जैन इरिगेशनने जलबचतीसह उत्पादनवाढीसाठी साध्य केलेले यश हे अन्नसुरक्षिततेच्या दृष्टीने कृषिक्षेत्रात गाठलेला मैलाचा ठप्पा ठरले आहे, असे अतुल जैन म्हणतात.

जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. ही कंपनी जळगाव स्थित आहे. ही कंपनी सिंचन क्षेत्रातील जागतिक पातळीवर सर्वांत मोठी कंपनी म्हणून ओळखली जाते. याचबरोबर आंबा प्रक्रिया, टिश्युकल्चर या क्षेत्रात जैन इरिगेशन जगात पहिल्या क्रमांकावर, तर कांदा निर्जलीकरण प्रक्रियेमध्ये जगात तिसरा क्रमांक आहे. ही कंपनी मुंबई स्टॉक एक्स्चेंजमध्ये सूचिबद्ध असून सद्यघडीला ६००० कोटी रुपयांची उलाढाल आहे.

कृषिक्षेत्राला वाहिलेली भारतातील सर्वांत मोठी एकात्मिक कृषी कंपनी म्हणून मागील २५ वर्षांपासून नावारूपास आलेली आहे. जैन इरिगेशनने आजवर लाखो अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक सुबत्ता आणली. या कार्याची दखल आजवर अनेक जागतिक मान्यवर संस्थांनी घेतली आहे.

जळगावसारख्या छोट्याशा गावी कंपनीने आकार घेऊन आज जागतिक पातळीवरील वृद्धी साध्य करण्यात जैन इरिगेशनने यश मिळविलेले आहे. रु. २५०० कोटी एवढ्या रुपयांची गुंतवणूक करून या विस्तारात कंपनीने सुमारे १० हजार व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगार, तर एवढ्याच १० हजार लोकांना अप्रत्यक्ष रोजगार मिळवून दिलेला आहे.

कंपनीने उभारलेल्या संशोधन व विकास केंद्राबाबत माहिती देताना अतुल जैन म्हणतात की, मोठ्या प्रमाणावर संशोधन व विकास प्रकल्प जळगाव येथे उभारला आहे. हा प्रकल्प कृषिक्षेत्र व जलव्यवस्थापन या क्षेत्राला वाहिलेला असून केंद्र सरकारच्या सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी विभागासह भारतातील सुमारे २३ कृषी विद्यापीठांनी व आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या कृषी संशोधन केंद्रांनी जैन इरिगेशन समवेत शिक्षणासाठी सामंजस्य करार केले आहेत. शेतीतील






उत्पादन वाढावे, जलसंधारणातून छोट्या शेतकऱ्यांना प्रगतीचे मार्ग मिळावेत, या दृष्टीने कंपनीचे कार्य सुरू आहे. या संशोधन व विकास प्रकल्पांसह कंपनीची भव्य लॅबोरेटरी आहे. या लॅबोरेटरीमध्ये १०० हून अधिक डॉक्टर्स व पदव्युत्तर शिक्षण झालेले संशोधक कार्यरत आहेत. शेतकऱ्यांच्या हाती कंपनीने विविध उच्च तंत्रज्ञान पोहोचवीत एखाद्या पडीक जमिनीचा विकास कसा होऊ शकतो, याचे प्रत्यक्ष केंद्र जैन हिल्सला साकारून दाखविले आहे. सुमारे ५० हजारांपेक्षा अधिक शेतकरी दरवर्षी भारताच्या कानाकोपऱ्यातून जैन हिल्सला भेट देतात. इथे येऊन हे शेतकरी उच्च तंत्रज्ञानाची माहिती घेऊन या तंत्रज्ञानाचा अवलंब त्यांच्या शेतीसाठी करतात. इथेच त्यांच्या प्रशिक्षणाचीही अद्ययावत व्यवस्था करण्यात आलेली आहे.

जैन इरिगेशनने जळगाव येथे सर्वांत मोठी टिश्युकल्चर लॅबोरेटरी स्थापन केली आहे. या लॅबोरेटरीमध्ये रोगमुक्त टिश्युकल्चरच्या रोपांची निर्मिती करून ही निरोगी रोपे शेतकऱ्यांच्या हाती दिली जातात. जैन इरिगेशनच्या टिश्युकल्चर केळी रोपांच्या लागवडीतून खान्देश विभाग सर्वाधिक केळीचे उत्पादन घेणारा म्हणून नावारूपास आला आहे. सुमारे १० ते १५ मे. टन एकरी उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या हाती या केळी रोपांच्या माध्यमातून आता २५ ते ३० मे. टन प्रतिएकर केळीचे उत्पादन शेतकऱ्यांना मिळत आहे. टिश्युकल्चर केळी लॅबमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष २००० महिलांना रोजगार उपलब्ध झाल्यामुळे त्याही त्यांच्या कुटुंबातील आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहेत. कंपनीने आता या विभागात पिकणारी दर्जेदार केळी विदेशात निर्यात करण्यासाठी पाउले उचलली आहेत. या निर्यातीतून शेतकऱ्यांच्या मनात नवा विश्वास जागृत होईल.

जळगाव येथील जैन इरिगेशनच्या फळप्रक्रिया प्रकल्पात सुमारे ३ लाख मे. टन फळे व भाजीपाल्यावर दर वर्षी प्रक्रिया केली जाते. या प्रक्रियेतूनच नाशवंत असणारी फळे व भाजीपाल्यांना मूल्यवृद्धी साध्य झाली आहे. कंपनीचा फळप्रक्रिया विभाग या व्यवसायातून सुमारे ५५० कोटी रुपयांचे विदेशी मूल्य कमविते. फळप्रक्रिया विभागाद्वारे कंपनीने सुमारे ४००० शेतकऱ्यांशी कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगचे मॉडेल यशस्वी करून दाखविले असून देशभरातील हे व्यावसायिक पातळीवरील शेतकऱ्यांसाठी नवी दिशा देणारे पहिले मॉडेल आहे. यात शेतकऱ्यांना पांढरा कांदा उत्पादनाबाबत बी-बियाणे पुरवून त्यांना योग्य ते तांत्रिक मार्गदर्शनही दिले जाते. यामुळे त्यांना उपलब्ध असलेल्या पाण्यातून व जमिनीतून अधिक उत्पादन घेता येणे शक्य झाले आहे. त्यांनी उत्पादित केलेला हा पांढरा कांदा कंपनी त्यांच्याकडून आश्वासित रकमेवर खरेदी करून त्यांना आर्थिक सुरक्षिततादेखील प्रदान करते.



श्री. किशोर कुलकर्णी

आता जैन इरिगेशन 'जैन फार्मफ्रेश' ब्रॅण्ड स्थानिक व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चालना देण्यासाठी नियोजन करीत आहे. जैन फार्मफ्रेश ब्रॅण्ड अंतर्गत विविध मूल्यवृद्धी साध्य केलेले व आंतरराष्ट्रीय गुणवत्तेचे फळ व भाजीपाला प्रक्रिया व्यवसायाला चालना देण्यासाठी विदेशी गुंतवणूकदारांकडून सुमारे १०० दशलक्ष यूएस डॉलर्सची गुंतवणूक आकर्षित करू पाहत आहे.

जैन इरिगेशन लोकल ते ग्लोबल

भवरलालजी जैन यांनी जैन ब्रदर्सरूपी लावलेल्या बीजाचे आता मोठ्या वटवृक्षात रूपांतर झाले आहे. याच्या शाखा जगभर पसरल्या आहेत. साउथ आणि लॅटीन अमेरिका येथे २ प्रकल्प, ५ वेअरहाउस आणि कार्यालये, २०० वितरक, नॉर्थ अमेरिका ६ प्रकल्प, ८ वेअरहाउस आणि कार्यालये, २५७ वितरक, युरोपमध्ये ४ प्रकल्प, ९ वेअरहाउस व कार्यालये आणि २५३ वितरक, आशिया (भारताव्यतिरिक्त) ३ प्रकल्प, २६ वितरक, ऑस्ट्रेलिया १ कार्यालय आणि १५० वितरक, आफ्रिकेत १५ वितरक असे जगभरात एकूण १५ प्रकल्प, २३ कार्यालये आणि वेअरहाउस आणि ९०१ वितरक असे मोठे जाळे जैन इरिगेशनचे आहे. असाच विचार भारताबाबत केला, तर भारतात विविध राज्यात पुढीलप्रमाणे संख्या आहे. त्यात महाराष्ट्रात एकूण ५ प्रकल्प, १८ ऑफिस, ९ डेपो आणि १२५६ वितरक आहेत. मध्य प्रदेशात १ ऑफिस ३ डेपो आणि १७३ वितरक, कर्नाटकमध्ये ५ कार्यालये २ डेपो आणि २३४ वितरक, गुजरातमध्ये २ प्रकल्प, ५ कार्यालये, २ डेपो आणि २४२ वितरक तमीळनाडूमध्ये १ प्रकल्प, ६ कार्यालये, ३ डेपो १०४ वितरक, राजस्थानमध्ये १ प्रकल्प, ३ कार्यालये, ४ डेपो आणि ९० वितरक आहेत. आंध्र प्रदेशात ३ प्रकल्प, २१ कार्यालये, ५ डेपो आणि २७० वितरक आहेत. अन्य राज्यांमध्ये २२ कार्यालये, १२ डेपो आणि ३४२ वितरक असे भरभक्कम जाळे निर्माण झाले आहे. देश-विदेशातील विभागीय कार्यालये, वितरक प्रतिनिधी यांच्या माध्यमातून जगभरातल्या १२३ देशांमध्ये जैन इरिगेशनची उत्पादने पोहोचली आहेत.

# ग्रामस्वच्छता अभियानात पिंगळवाडे ग्रामपंचायत प्रथम

## निर्मलग्राम समितीचा निकाल; स्वच्छ प्राथमिक शाळेतही बाजी



**डाविकडून भा. ना. सैदाणे, श्री. अनिल पाटील, श्री. धायगुडे आणि प्रकाश पाटील**

**जळगाव :** संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा २०१४-१५ अंतर्गत दोन दिवस झालेल्या तपासणीअंती पिंगळवाडे (ता. अमळनेर) ग्रामपंचायत जिल्हास्तरावर प्रथम राहिली. तसेच सानेगुरुजी स्वच्छ प्राथमिक शाळेचा पुरस्कारही पिंगळवाडे येथील शाळेने पटकाविला.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान व शाहू, फुले, आंबेडकर दलित विकास व सुधारणा अभियान सन २०१४-१५ अंतर्गत सातारा जिल्हास्तरीय समितीकडून जिल्ह्यातील ग्रामपंचायतीची जिल्हास्तरीय तपासणी केली. सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष माणिकराव सोनवलकर, सीईओ नितीन पाटील यांच्यासह पंधरा सदस्य असलेल्या समितीतर्फे २८ व २९ ऑक्टोबरदरम्यान जिल्ह्यातील तीस ग्रामपंचायतीची तपासणी केली. दोन दिवसांच्या तपासणीनंतर समितीतर्फे आज जिल्हा परिषदेकडे सदर तपासणी अहवाल व स्पर्धेचा निकाल देण्यात आला. या निकालाची घोषणा आज करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी आस्तिककुमार पांडेय यांच्या आदेशावरून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संजय मस्कर यांनी निकाल घोषित केला. या वेळी सामान्य प्राशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नंदकुमार वाणी उपस्थित होते.

**स्पर्धेचा निकाल असा–**

समितीतर्फे देण्यात आलेल्या निकालानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामस्पर्धेत ग्रामपंचायतीमध्ये जिल्हास्तरावर प्रथम- पिंगळवाडे (ता. अमरळनेर), द्वितीय- नरवेल (ता. मुक्ताईनगर), तृतीय- धामोडी (ता. रावेर) राहिले. तसेच स्वच्छ प्राथमिक शाळा/ अंगणवाडी पुरस्कारासाठी झालेल्या तपासणीत पिंगळवाडे (ता. अमळनेर) शाळेला सानेगुरुजी स्वच्छ प्राथमिक शाळा पुरस्कार आणि नरवेल (ता. मुक्ताईनगर) अंगणवाडी क्र. १९/१ सावित्रीबाई फुले स्वच्छ अंगणवाडी पुरस्कारासाठी पात्र ठरली. त्याचप्रमाणे शाहू, फुले, आंबेडकर दलितवस्ती विकास व सुधारणा अभियानात प्रथम-पहुरपेठ (ता. जामनेर), द्वितीय- वरखेडे खुर्द (ता. बोदवड) आणि तृतीय- पाडळसे (ता. यावल) ग्रामपंचायत राहिली.



**विशेष पुरस्कार**

पाणी/ सांडपाणी व्यवस्थापनासाठी स्व. वसंतराव नाईक पुरस्कार शहापुरा (ता. पाचोरा), कुटुंब कल्याणासाठी स्व. आबासाहेब खेडकर पुरस्कार टाकळी प्र.द. (ता. चाळीसगाव) आणि सामाजिक एकतेसाठी स्व. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार कळमसरा (ता. पाचोरा) ग्रामपंचायतीस मिळाला.



**शाहिर श्रावणवाणी मुलांना मार्गदर्शन करताना**



**साहित्यीकांनी शाळेला सदिच्छा भेट दिली (पिंगळवाडे)**



**क्रांती चौक (पिंगळवाडे)**